# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org

**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /UPSC/२०२५/383

दिनांक :- 04 FEB 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सोबत जोडलेल्या यादीतील संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी बैठकीकरीता अमरावती विभागातील सर्व महाविद्यालयातील UPSC समन्वयक यांना बैठकीकरीता उपस्थित राहण्याकरीता आपल्या स्तरावरुन आदेशित करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती यांचे पत्र क्रमांक :- प्री-आएएसअम/२०२४-२५/४६ दिनांक ३०/१/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रीआय/५४२४/प्र.क्र.२३८/८३८६४३/मशि-२ दिनांक २५ सप्टेंबर २०२४ चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील ६ प्रशिक्षण केंद्रामध्ये सुधारणा करणेकरीता मा.श्री. जे.पी. डांगे, सेवानिवृत्त मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. सदर समितीचे अध्यक्ष हे दिनांक ११/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० ते २.०० या कालावधीत अमरावती विभागातील १० महाविद्यालयातील प्राचार्य व सबंधित महाविद्यालयातील UPSC समन्वयक यांची बैठक **भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नविन इमारत, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परीसर, अमरावती** येथे आयोजित केलेली आहे.

तरी सोबत जोडलेल्या यादीतील संस्थेचे प्राचार्य व समन्वयकांनी **दिनांक ११/२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता** दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहावे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी तसेच ई-मेल करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
**भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,अमरावती.**
(PRE- IAS TRAINING CENTRE,AMRAVTI)
नवीन इमारत,शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परीसर,
व्हि.एम.व्हि.रोड,अमरावती - ४४४६०४
Web : www.gpiasamt.org दुरध्वनी/ फॅक्स क्रमांक:०७२१-२५३०२१४ E-mail : director@gpiasamt.org

दिनांक- ३०/०१/२०२५

जावक/प्री-आयएएसअम/२०२४-२५/46

प्रति,

सहसंचालक,
तंत्र शिक्षण अमरावती विभाग,
अमरावती.४४४६०४

**विषय :-** दिनांक ११ फेब्रु..२०२५ रोजी बैठकीकरिता अमरावती विभागातील सर्व महविद्यालायातील Upsc समन्वयक यांना बैठकीकरिता उपस्थित राहण्याकरिता आपल्या स्तरावरून आदेशित करण्याबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग प्रीआय/५४२४/प्र.क्र.२३८/८३८६४३/मशि-२, दिनांक २५ सप्टे.२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भातील शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील ०६ प्रशिक्षण केंद्रामध्ये सुधारणा करणेसाठी मा.श्री.जे.पी.डांगे से.नि. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. सदर समितीचे अध्यक्ष हे दिनांक ११ फेब्रु.२०२५ रोजी सकाळी १२.०० ते २.०० या कालावधीत अमरावती विभागातील निवडक १० महाविद्यालयातील प्राचार्य व सबंधित महाविद्यालायातील UPSC समन्वयक यांची बैठक भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र,अमरावती येथे घेणार आहेत. तरी सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व समन्वयक यांना बैठकीकरिता वेळेवर हजर राहणेबाबत आपलेस्तरावरून आदेशित करावे. ही विनंती.

आपली विश्वासू ,

Swale

(डॉ.श्रीमती संगिता व्हि.पकडे)
संचालक,
भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,
अमरावती.

राज्यातील भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करणे व समितीची कार्यकक्षा निश्चित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : प्रीआय-५४२४/प्र.क्र.२३८/८३८६४३/मशि-२,**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ सप्टेंबर, २०२४.

**प्रस्तावना :-**

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या परिक्षांमध्ये राज्यातील विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेचे प्रमाण वाढावे ही बाब विचारात घेऊन राज्यातील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केन्द्र, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद व कोल्हापूर येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करुन समितीची कार्यकक्षा निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केन्द्र, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद व कोल्हापूर या प्रशिक्षण केंद्रामध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | मान्यवरांचे नाव व पदनाम | समितीमध्ये पद |
|---|---|---|
| १ | श्री. जे.पी.डांगे, से.नि. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | श्री. आनंद पाटील, भा.प्र.से. | सदस्य |
| ३ | श्री. महेश भागवत, भा.पो.से. | सदस्य |
| ४ | श्रीम. सुप्रिया देवस्थळी, आय.सी.ए.एस. | सदस्य |
| ५ | श्री. सुशिल गायकवाड, आय.आर.टी.एस. | सदस्य |
| ६ | श्री. विवेक कुलकर्णी, संचालक, ज्ञानप्रबोधिनी, पुणे | सदस्य |
| ७ | श्री.विनोद मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य |
| ८ | डॉ.शैलेद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य सचिव |

२. राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये सुधारणा करण्यासाठी खालील बाबींवर गुणात्मक उपाययोजना सुचविण्यात याव्यात अशी समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | गुणात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी विचाराधीन बाबी. |
|---|---|
| १ | अध्यापन, शिक्षण आणि मुल्यांकन पध्दती |
| २ | भौतिक सुविधा संसाधने व तांत्रिक सुविधा |
| ३ | प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी करावयाचे प्रयत्न |
| ४ | ग्रंथालय सुविधा |
| ५ | प्रशिक्षणाचा कालावधी |
| ६ | ताणतणाव व्यवस्थापन |
| ७ | विद्यार्थ्यांना दिले जाणारे विद्यावेतन |
| ८ | मार्गदर्शकांना देण्यात येणारे मानधन |
| ९ | सर्व केंद्रामध्ये डिजीटल कनेक्टीविटी |
| १० | विद्यार्थ्यांना निवासी वसतिगृह |
| ११ | केंद्रामध्ये संगणक प्रयोगशाळा सुविधा |
| १२ | सर्व केंद्रावरील पदांचा आढावा |
| १३ | सुरक्षा रक्षक व स्वच्छक यांची पदे कंत्राटी स्वरुपात भरणेबाबत. |
| १४ | प्रवेश प्रक्रिया व वसतिगृह प्रवेश याबाबत एकसमान नियमावली बाबत सूचना करणे. |
| १५ | नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातून मुलाखतीसाठी जाणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी मुलाखत पूर्व प्रशिक्षण. |

३. प्रस्तुत समितीने याबाबतचा अहवाल शासनास तीन महिने एवढया कालावधीत सादर करावा.

४. सदर समितीच्या शासकीय / अशासकीय सदस्यांना शासकीय नियमाप्रमाणे बैठक भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. सदर भत्त्यावरील खर्च प्रशिक्षण केन्द्रासाठी २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०९२५१८२७०७३२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HEMANT S PATHAK

Digitally signed by HEMANT S PATHAK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=1a58924bb1ebc2ed6699e048bfa42ad41d1ed32de1e3eda84d0c03040473905e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=EE03447853A43CF2A3547CBC186E49802A70EF183CF488073E81785E6AD171A6, cn=HEMANT S PATHAK
Date: 2024.09.26 13:41:05 +05'30'

**(हे. सु. पाठक)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव

२) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

३) सर्व समिती सदस्य,(संचालक, उच्च शिक्षण यांचे मार्फत)

४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

५) संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई.

६) संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केन्द्र, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद व कोल्हापूर.

७) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण

८) निवड नस्ती/मशि-२.

# Regarding setting up of Compitative examination guidance center and appointment of coordinator

| अ . क्र . | डी टी ई कोड | संस्थेचे नावं | समन्वयकाचे नावं | भ्रमणध्वनी क्र. | ई. मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| | | **Engineering** | | | |
| 1 | 1012 | Government College of Engineering, Yavatmal | Shri V.R. Deshmukh lect. civil engg | 9850536809 | vrd15362@gmail.com |
| 2 | 1101 | Shri Sant Gajanan Maharaj College of Engineering,Shegaon | Dr. Javed G. Khan | 8275341268 | itsjaweed@gmail.com |
| 3 | 1107 | P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati | Prof. Sunpreet Kaur Nanda | 9673429952 | sunpreetkaurbedi@gmail.com |
| 4 | 1114 | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering & Technology, Amravati | Prof.S.M.Patil | 9766492925 | patilsarj@gmail.com |
| 5 | 1116 | Shri Shivaji Education Society's College of Engineering and Technology, Akola ya | Dr. S. K. Agrawal | 9960590205 | tpocoetakola@gmail.com |
| | 1117 | Babasaheb Naik College of Engineering,Pusad | Prof.Sanjay S.Patil | 9405907396 | Washimsanju123@yahoo.com |
| 6 | 1119 | Paramhansa Ramkrishna Maunibaba Shikshan Santha's , Anuradha Engineering College, Chikhali | Prof. P.P. Kulkarni | 9096906305 | kul.gokul@gmail.com |
| 7 | 1120 | Jawaharlal Darda Institute of Engineering and Technology, Yavatmal | Mr Swaraj D. Ajane | 8625931833 | swaraj_ajane@jdiet.ac.in |
| 8 | 1121 | Shri Hanuman Vyayam Prasarak Mandals College of Engineering & Technology, Amravati | Mr. Pravin D.Kaware | 9975769161 | pravin.kaware@rediffmail.com |
| 9 | 1123 | Indira Bahuuddeshiya Shikshan Sanstha, College of Engineering, Ghatkheda, Amravati | DR R M DESHMUKH | 9403304392 | ravindra.dshmkh@gmail.com |
| 10 | 1127 | Jagadambha Bahuuddeshiya Gramin Vikas Sanstha's Jagdambha College of Engineering and Technology, Yavatmal | Mr.K.N.Kalaspurkar | 7276357489 | kaustubh_kalas@rediffmail.com |
| 11 | 1128 | Vidarbha Youth Welfare Society's, Prof Ram Meghe College of Engineering and Management, Badnera | Mr.Amitkumar Ranit | 9405335819 | amitkumar.ranit@prmceam.ac.in |
| 12 | 1180 | Sanmati Engineering College, Sawargaon Barde, Washim | prof.niraj walchale | 8551841000 | niraj@sanmati.in |
| 13 | 1182 | Padmashri Dr. V.B. Kolte College of Engineering, Malkapur, Buldhana | Prof Yugesh Kharche | 9028044902 | yugeshkharche7@gmail.com |

# Regarding setting up of Compitative examination guidance center and appointment of coordinator

| अ. क्र. | डी टी ई कोड | संस्थेचे नावं | समन्वयकाचे नावं | भ्रमणध्वनी क्र. | ई. मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| 14 | 1265 | Mauli Group of Institutions, College of Engineering and Technology, Shegaon. | Prof. Satish Panjabrao Pawar | 9881969741 | satishpawar854@gmail.com |
| 15 | 1276 | Mavav School of Engineering & Technology, Gut No. 1035 Nagpur Surat Highway, NH No. 6 Tal.Vyala, Balapur, Akola, 444302 | **Prof Ganesh A Nerkar** | 8600007637 | prof.ganerkar@gmail.com |
| 16 | 1289 | P.R. Patil College of Architecture, Amravati | Prof. Sachin Hajare | 9975452239 | hajaremohini@gmail.com |
| 17 | 1102 | Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati | Prof. K. P. Raghuwanshi | 9860467327 | vbmvmcaplacement@gmail.com |
| | | **Pharmacy** | | | |
| | 1003 | Government College of Pharmacy, Amravati | Dr. Kundan S. Patil | 9421918049 | kundan_patil36@rediffmail.com |
| 1 | 1131 | Vidya Bharati College of Pharmacy, Amravati | PROF A.R. JAISWAL | 9422214050 | vbcop_office14@rediffmail.com |
| 2 | 1133 | Anuradha College Of Pharmacy, Chikhli | Prof. Pawan Folane | 9689572736 | pnfolane1990@gmail.com |
| 3 | 1270 | MUP's College of Pharmacy (B. Pharm), Degaon Tq. Risod Dist. Washim | Prof. Dinesh D. Ghube | 9673544222 | bpharmprincipal@gmail.com |
| 4 | 1271 | Rajashri Sahhu College of Pharmacy, Buldhana. | Prof.Madhav D.Chakolkar | 7588084513 | maddychakolkar@gmail.com |
| 5 | 1280 | Gawande College of Pharmacy, Sakharkherda | Prof. S. U. Nagrik | 9119540650 | gcpkherda@gmail.com |
| 6 | 1282 | Laddhad College of Pharmacy, Yelgaon, Buldhana | Prof. V. M. Shejol | 9422945569 | lcpbuldana@gmail.com |
| 7 | 1283 | P. R. Pote Patil College of Pharmacy, Amravati | PROF. V. A. BHADANGE | 9762750475 | prppharmacycollege@gmail.com |
| 8 | 1286 | Institute of Pharmacy & Research, Badnera | Dr. S. J. Dighade | 9405456252 | principaliopr@gmail.com |
| 9 | 1290 | Jagadambha Institute Of Pharmacy And Research, Kalamb | Prof. S.P.Jaiswal | 9850174812 | sp.jaiswal299@gmail.com |

## Regarding setting up of Compitative examination guidance center and appointment of coordinator

| अ . क्र . | डी टी ई कोड | संस्थेचे नावं | समन्वयकाचे नावं | भ्रमणध्वनी क्र. | ई. मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| 10 | 1293 | Shraddha Institute Of Pharmacy, Washim | Mr.P.A.Shelke | 9527071465 | shraddhapharmacy2019@gmail.com |
| 11 | 1294 | Samarth College Of Pharmacy, Deulgaon Raja | Prof. G.S. Pimple | 8888696823 | scopdeulgaonraja2019@gmail.com |
| 12 | 1295 | Dr. Rajendra Gode College Of Pharmacy, Amravati | Prof. B. R. Gudalwar | 8459106757 | brgudalwar16@gmail.com |
| 13 | 1292 | Dr. R. N. Lahoti Institute of Pharmaceutical Education and Research Center Sultanpur | Prof. S. K. Mohrut | 8767546184 | drrnlpharmainstitute@gmail.com |

Joint Director,
Technical Education,Amravati

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४७
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/स्पर्धा प्रशिक्षण केंद्र प्रवेश/२०२३/२३८ दिनांक : 9 AUG 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर

विषय :- सन २०२३-२४ करिता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्र तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रांमधील प्रवेशासाठी दिनांक २७.८.२०२३ रोजी होणा-या एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत....

संदर्भ : संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबई यांचे पत्र क्रमांक एसआयएसी/ २०२३/ प्रवेश परीक्षा/३३८, दिनांक १७.७.२०२३

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन व उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक,कोल्हापूर,औरंगाबाद, अमरावती व नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचालित डॉ.आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र,पुणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) संचालित सावित्रीबाई फुले अॅकॅडमी पुणे, अंबरनाथ नगरपालिकेचे स्पर्धा परीक्षा केंद्र,अंबरनाथ, ठाणे महानगरपालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,ठाणे इ.संस्थांमार्फत **केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ करिता पुर्णवेळ विनामुल्य प्रशिक्षण देण्याकरिता दिनांक २७.८.२०२३ रोजी ऑफलाईन सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी इच्छुक पात्र उमेदवारांकडून Online पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.** याबाबतची सविस्तर जाहिरात,परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता,ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सुचना,शासनमार्फत दिले जाणारे विद्यावेतन व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर माहिती आपल्या विभागातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना त्यांच्या संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याबाबत कळविण्यात यावे. (सोबत पत्राची आणि जाहिरातीची प्रत जोडली आहे)

( डॉ.सुनिल भामरे )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबई यांना माहितीसाठी ई मेल मार्फत (siac1915@gmail.com)

E:\Budage\2023-24\General Correspondence\UPSC _Competative exam training center admission CET.docx

653

पत्र प्राप्त झाले
3 AUG 2023
तंत्र शिक्षण संचालनालय
महापालिका मार्ग, मुंबई

महाराष्ट्र शासन

# राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC)

( प्रि आय ए एस ट्रेनिंगसेंटर )

हजारीमलसोमाणी मार्ग , छत्रपत्ती शिवाजी महाराज टर्मिनस्समोर, मुंबई -४०० ००१

Tel. No: 022 22070942 web: www.siac.org.in e-mail:siac1915@gmail.com

---

जा.क्र.एसआयएसी/२०२३/प्रवेश परीक्षा/७३४ दिनांक- १७/०७/२०२३

प्रति,

मा.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमासमोर,
धोबी तलाव, फोर्ट, मुंबई

आवक क्र. ८३८३४९
दिनांक ३/८/२०२३
कार्यासन क्र. २४

**विषय-सन २०२३-२४ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी दिनांक २७.०८.२०२३ रोजी होणाऱ्या एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षे ची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वाढीव सहभागासाठी निदर्शनास आणून देण्याबाबत**

संदर्भ- शासन निर्णय क्रमांक-प्रीआय/५४१९/प्र.क्र.२४०/मशि-२, दि. १.११.२०२२

मा.महोदय,

उपरोक्त विषयाच्या बाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापुर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकॅडमी पुणे, अंबरनाथ नगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र, अंबरनाथ, ठाणे महानगर पालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, ठाणे ई. केंद्रामधील प्रवेश परिक्षेसाठी दिनांक २७.०८.२०२३ रोजी ऑफलाईन सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या करीता इच्छुक पात्र उमेदवारांकडुन Online पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. सुलभ संदर्भासाठी जाहिरातीची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

सदर जाहिरात आपल्या विभागातील महाविद्यालय/विद्यापीठ यांच्या निदर्शनास आणून देण्या संदर्भात आपल्या स्तरावरुन आदेशीत करावे हि विनंती.

सोबत-जाहिरातीची प्रत

आपली विश्वासू

डॉ.स्वाती वाव्हळ
संचालक, SIAC, मुंबई
समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा

महाराष्ट्र शासन

## राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC),मुंबई

## नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ साठी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) बाबत जाहिरात

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC) मुंबई. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांच्यासह यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (ACEC) पुणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) पुणे , पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचलित सावित्रीबाई फुले अकॅडेमी, पुणे, अंबरनाथ नगरपालिका संचलित युपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र (UPSCCETC) अंबरनाथ, ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (CDIAC) ठाणे यांचे मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ साठी पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून सर्व शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या इच्छुक पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक:-**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज | दि.१४.७.२०२३ (पासून) |
| २ | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १४.०८.२०२३ (पर्यंत) |
| ३ | परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १५ .०८.२०२३ |
| ४ | लेखी प्रवेश परीक्षा दिनांक | दि. २७.०८.२०२३ |

**टीप: -**

1 विद्यार्थ्यांना प्रवेश लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील प्राप्त गुण व त्यांनी प्रशिक्षण केंद्रासाठी दिलेला विकल्प या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. लेखी परीक्षे नंतर मुलाखतीचे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले जाईल.

2 सामायिक प्रवेश परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर लॉग इन-करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.

3 प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिकरित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल .

**सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना शासना मार्फत दिले जाणारे विद्यावेतन व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

दिनांक: ११ .०७.२०२३
स्थळ: मुंबई

सही/-
**डॉ. स्वाती वाव्हळ**
संचालक, SIAC, मुंबई
समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## State Institute For Administrative Careers (SIAC), Mumbai

## Hajarimal Somani marg, Opposite Chhatrapati Shivaji Maharaj Terminus,Mumbai

## Advertisement

Online application from degree holders of all the faculties are invited for the Common Entrance Test for free full-time coaching for Union Public Service Commission, Entrance Examination 2024, given at Govt. of Maharashtra's State Institute for Administrative Careers (SIAC), Mumbai and Pre-IAS Training Centres (PITCs), Nashik, Kolhapur, Aurangabad, Amravati and Nagpur under the Higher and Technical Education Department, Dr. Ambedkar Competitive Examination Guidance Centre (ACEC), YASHADA , Dr.Babasaheb Ambedkar Research and Training Center (BARTI) Pune, Savitribai Phule Academy, Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC), Pune, Ambernath Municipal Corporation Competitive Examination Centre (UPSCCETC), Thane Municipal Corporation Chintamanrao Deshmukh Administrative Training Institute, Thane .

**Timetable of Admission Process:**

| | | |
|---|---|---|
| 1. | Online Application | Dt. 14.07.2023 to 14.08.2023 |
| 3. | Last date for payment of fees | Dt. 15.08.2023 |
| 4. | Date of Online Examination | Dt. 27.08.2023 |

**Note:-**

1.The final merit list will be prepared on the basis of the combined marks obtained by the candidate in online examination and personal interview and the coaching center for which they have opted.

2.The candidates may login to the admission portal to select the option of coaching center after the declaration of the results of the online examination.

3.Visit official website of SIAC, www.siac.org.in for the detailed advertise, syllabus and eligibility criteria for the Common Entrance Test, instructions to fill the online examination form, reservation criteria for admission, information regarding stipend given by State Government to the students, and any other relevant information.

Date: 11 .07.2023

Place: Mumbai

sd/-

Director, SIAC, Mumbai

Nodal Officer, Common Entrance Test

## महाराष्ट्र शासन

## राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC),मुंबई

## नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ साठी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) बाबत जाहिरात

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC CIVIL SERVICES EXAMINATION for IAS/IPS/IFS/ IRS, etc.) नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ करीता पूर्व प्रशिक्षणासाठी राज्यातील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर या सहा केंद्रातील तसेच शासनाच्या इतर विभागातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA) संचलीत डॉ आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (ACEC) पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचलित सावित्रीबाई फुले अॅकेडमी, पुणे, अंबरनाथ नगरपालिका संचलित यु.पी.एस.सी. स्पर्धा परिक्षा केंद्र(UPSCCETC), अंबरनाथ, ठाणे नगरपालिका संचलित सी.डी.देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (CDIAC), ठाणे येथील प्रवेशासाठी सर्व शाखेतील पदवी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या इच्छुक उमेदवारांसाठी विनामूल्य प्रशिक्षणाकरीता सामाईक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) रविवार दि. २७.०८.२०२३ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत घेण्यात येईल.

**प्रवेश परीक्षा कार्यक्रम:**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सुरुवात | दि. १४.०७.२०२३ | सकाळी १०.०० पासून |
| २ | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १४.०८.२०२३ | रात्री १२.०० पर्यंत |
| ३ | परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १५.०८.२०२३ | रात्री १२.०० पर्यंत |
| ४ | सामाईक प्रवेश परीक्षा | दि. २७.०८.२०२३ | सकाळी ११.०० ते दु.१.०० पर्यंत |
| ५ | लेखी परीक्षा निकाल | दि. २६.०९.२०२३ | सांय ५.०० वाजता |

**प्रशिक्षण कार्यक्रम २०२४ साठी एकूण प्रवेश क्षमता-**

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्रांचे नाव | केंद्रातील प्रवेश क्षमता | बार्टी अनुदानीत | अल्पसंख्याक अनुदानीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई | १०० | १० | १० | १२० |
| २ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर | १०० | १० | १० | १२० |
| ३ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद | ६० | १० | १० | ८० |
| ४ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर | ६० | १० | १० | ८० |
| ५ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | ६० | १० | ० | ७० |
| ६ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती | ६० | १० | ० | ७० |
| ७ | यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA) संचलीत डॉ आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (ACEC) पुणे | ६० | ० | १० | ७० |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे, | ३०० | ० | ० | ३०० |
| ९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचलित सावित्रीबाई फुले अॅकेडमी, पुणे | ५० | ० | ० | ५० |
| १० | अंबरनाथ नगरपालिका संचलित युपीएससी स्पर्धा परिक्षा केंद्र(UPSCCETC), अंबरनाथ | २५ | ० | ० | २५ |
| ११ | ठाणे नगरपालिका संचालित सी.डी.देशमुख युपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र(CDIAC), ठाणे | ७० | ० | ० | ७० |
| | एकूण- | ९४५ | ६० | ५० | १०५५ |

- वरील संस्थेतील प्रवेश आरक्षणा बाबतचा तक्ता सोबत स्वतंत्रपणे जोडण्यात आला आहे.
  बार्टी व अल्पसंख्यांक उमेदवार वगळुन उर्वरीत उमेदवारांना शासन निर्णय प्रमाणे नमूद सामाजिक आरक्षण लागु राहिल.

**प्रवेश परीक्षा पध्दत:-**

लेखी परीक्षा २०० गुण व मुलाखत ५० गुण अश्या प्रकारे सामाईक प्रवेश परिक्षा एकुण २५० गुणांची राहील. सामाईक प्रवेश परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या धर्तीवर घेण्यात येईल. नागरी सेवा पूर्व परीक्षेचा पेपर I व पेपर II स्वतंत्र न घेता एकाच प्रश्नपत्रीकेत ( भाग I व भाग II) या प्रमाणे विभागणी करण्यात येईल. त्यात सामान्य अध्ययन भाग I (५० प्रश्न १०० गुणांचा) राहिल व भाग II (कलमापन चाचणी - CSAT) (४० प्रश्न १०० गुणांचा) राहील.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकुणगुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| SECTION-I सामान्य अध्ययन-I | ५० | १०० | HINDI AND ENGLISH | सकाळी -११.०० ते दु.१.०० वाजेपर्यंत एकुण वेळ: २ तास | वस्तुनिष्ठ Objective Type (MCQ) Negative Marking - One-third (०.३३%) of the marks assigned to that question |
| SECTION-II सामान्य अध्ययन -II (CSAT) | ४० | १०० | HINDI AND ENGLISH | | |
| अभिरुप मुलाखत | | ५० | MARATHI HINDI AND ENGLISH | मुलाखतीचे कार्यक्रम परीक्षेनंतर कळविण्यात येईल | |

- सामान्य अध्ययन SECTION-II (CSAT) हा Qualifying Section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणापैकी ३३गुण असणे अनिवार्य आहे
- UPSC नागरी सेवा (पूर्व) परीक्षेनुसार गुणवत्ता यादी SECTION-I सामान्य अध्ययन या भागातील गुणांवर व मुलाखत मध्ये प्राप्त गुणांवर आधारीत असेल.

भाग- १ मध्ये मिळालेल्या एकुणगुणांच्या आधारे, गुणवत्ता यादीप्रमाणे व निवडलेल्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश देण्यात येईल. प्रवेशासाठी दिलेले प्रशिक्षण केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

**शैक्षणिक पात्रता:-**

उमेदवार हा कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा

**वयोमर्यादा:-** (दि.१४ जुलै २०२३ रोजी)

१) वय -२१ ते ३२ वर्षे (खुला संवर्ग)
२) वय - २१ ते ३५ वर्षे ( इ.मा.व./वि.मा./वि.जा./भ.ज./ EWS )
३) वय - २१ ते ३७ वर्षे (अनु. जाती जमाती )

**अधिवास:-**

उमेदवार महाराष्ट्राचा रहीवाशी (Domicile of Maharashtra) असावा अथवा शा.नि. मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ नुसार महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील असल्यास उमेदवाराने अर्जात उमेदवार पात्रता परीक्षा महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील निर्देशित गाव किंवा शहरातील संस्थे मधुन उत्तीर्ण झाल्याचे नमूद करणे आवश्यक असेल. तसेच अर्जा सोबत प्रवेशाच्या वेळी संबंधित उमेदवारानी त्यांच्या पालकांचे महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहीवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र तसेच उमेदवाराची मातृभाषा मराठी असल्याचे संस्थेच्या प्राचार्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच १० वीची परीक्षा मराठी विषय घेवून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**वसतीगृह व्यवस्था व विद्यावेतन :-**

अल्पसंख्यांक, बार्टी व प्रशिक्षण संस्थेतील स्थानिक रहिवासी वगळून इतर उमेदवारांना उपलब्धतेनुसार गुणांनुक्रम मोफत/सशुल्क वसतिगृहाची सुविधा देण्यात येईल. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांना मासिक विद्यावेतन शासन निर्णयानुसार व शासनाने वेळो वेळी दिलेल्या सुचनेनुसार देण्यात येईल.

**प्रवेश शुल्क:-**

१) **खुला प्रवर्ग (सर्वसाधारण) :- रु. ६००/-**

२) **मागास प्रवर्ग** :- रु. ४००/- ( इ.मा.व./वि.मा./वि.जा.भ.ज./EWS/ अनु. जाती जमाती )

प्रवेश शुल्क भरणा ऑनलाईन पध्दतीनेच करावा लागेल.

**परीक्षा/प्रवेशासंबंधी महत्वाच्या सुचना:**

१) उमेदवाराने अर्जामध्ये दर्शविलेल्या प्रशिक्षण केंद्रापैकी आपल्या सोयीचे पसंतीक्रम द्यावे. उपलब्ध जागा व गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. एकदा निवडलेल्या प्रशिक्षण केंद्रामध्ये बदल करता येणार नाही.

२) एस.आय.ए.सी मुंबई व महाराष्ट्रातील इतर भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व केंद्रां मध्ये पूर्वपरीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना त्याच केंद्रात पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही.

३) जाहिरातीमध्ये नमूद केंद्रासाठी सामाईक परीक्षा घेण्यात येत असल्याने उमेदवाराने लेखी परिक्षेसाठी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या केंद्रा पैकी एक परिक्षा केंद्र निवडावे. एकदा निवडलेल्या परिक्षा केंद्रात बदल करता येणार नाही. प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन असल्याने कोणतेही शैक्षणिक प्रमाणपत्र या कार्यालयात पाठवू नये. प्रत्यक्ष प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी करुन प्रवेश दिला जाईल.

४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचलित सावित्रीबाई फुले अॅकडमी, पुणे येथे प्रवेश घेण्यास इच्छूक उमेदवारान पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचा स्थानिक रहिवासी दाखला सादर करणे आवश्यक आहे.

५) प्रवेशाच्या वेळी खालील नमूद केल्या प्रमाणे प्रमाणपत्र, सादर करणे आवश्यक राहिल

- विद्यापीठ पदवी गुणपत्रिका/ विद्यापीठ पदवी प्रमाणपत्र.
- जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र.
- मुळ टि.सी. ( Transfer Certificate )
- महाराष्ट्र रहिवासी प्रमाणपत्र.
- नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असावे
- वास्तव्याचा पुरावा
- वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र इ.
- बार्टी प्रशिक्षण योजनेकरीता निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांनी बार्टी संकेतस्थळाच्या नोटीसबोर्डवरील Delhi UPSC-२०२४-ADVT and GUIDELINES यावर भेट द्यावी.

सदरीलकागदपत्रांची पुर्तता न झाल्यास प्रवेश निश्चित होणार नाही.

६) ऑनलाईन अर्ज व इतर सुचनांसाठी व संपर्कासाठी एस.आय.ए.सी मुंबई व महाराष्ट्रातील इतर भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र यांचे संकेतस्थळ खालील प्रमाणे दिलेले आहेत. संबधीत सहयोगी संस्थेत प्रवेश घेणेकामी अधिक माहितीसाठी सहयोगी संस्थेच्या खालील नमूद संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

| अ.क्र. | केंद्रांचे नाव | संकेतस्थळ/ ई मेल | संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई | www.siac.org.in | 022-22070942 |
| २ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,नागपूर | www.preiasnagpur.in | 0712-2565626 |
| ३ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,औरंगाबाद | www.preiasaurangabad.ac.in | 0240-2332210 |
| ४ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर | www.pitekolhapur.org | 0231-2528351 |
| ५ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक | www.iasnashik.org.in | 0253-2230100 |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,अमरावती | www.gpiasamt.org | 0721-2530214 |
| ७ | यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA) संचलीत डॉ आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (ACEC) पुणे | www.yashada.org<br>yashda@vsnl.com<br>prakash.pote@yashada.org<br>ajit.karpe@yashada.org | 020-25608203 |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे. | www.barti.in<br>barticec16@gmail.com<br>cecbarti@gmail.com | 020-26343600 Ext.238 |
| ९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचलित सावित्रीबाई फुले अॅकेडमी, पुणे | www.pcmcindia.gov.in<br>sports@pcmcindia.gov.in<br>commissioner@pcmcindia.gov.in | 020-27425600<br>020-67330000 |
| १० | अंबरनाथ नगरपालिका संचलित यु.पी.एस.सी. स्पर्धा परिक्षा केंद्र(UPSCCETC), अंबरनाथ | Ambarnathcouncil.net<br>chiefofficerambarnath@gmail.com | 0251-2682353 |
| ११ | ठाणे नगरपालिका संचलित सी.डी.देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (CDIAC) ठाणे | www.cdinstitute.in<br>cdinstitute@thanecity.gov.in | 022-25881421 |

७) प्रवेशित विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२४ देणे बंधनकारक असेल.

८) प्रवेशित उमेदवारास प्रशिक्षणसंस्थेकडून अथवा शासनाकडून घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९) प्रवेश परीक्षे नंतर आदर्श उत्तर तालिका, निकाल, गुणवत्ता यादी, प्रवेश यादी, वरील संकेतस्थळांवर प्रकाशित करण्यात येईल. याबाबत कोणत्याही उमेदवाराला वैयक्तिक कळविण्यात येणार नाही.

१०) प्रवेश परीक्षेचा ऑनलाइन अर्ज भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास उमेदवारांनी परिक्षा अर्ज नोंदणी केलेल्या संकेतस्थळावर नमूद केलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल वर संपर्क साधावा.

११) परीक्षेच्या वेळी उमेदवाराला कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास त्याकरीता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई तसेच सहयोगी प्रशिक्षण संस्था जबाबदार राहणार नाहीत. तसेच कोणत्याही परिस्थितीत फेर परीक्षा घेतली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

१२) परीक्षेचा अभ्यासक्रम सर्व संस्थेच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

१३) प्रवेशा संदर्भात संबंधित केंद्रांच्या संचालकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१४) सहयोगी संस्थेकडुन प्राप्त होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या कमी जास्त करण्याच्या अधिकार संबंधीत संस्थेचा राहील.

ठिकाण : मुंबई

दिनांक

सही/-

**संचालक,**

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई

( समन्वयक,सामाईकप्रवेश परीक्षा )